# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.01.2026** **वारःशुक्रवार**

---

1. राज्यात 29 महापालिकांसाठी 55 ते 60 टक्के मतदान झाल्याचा अंदाज
2. महापालिका निवडणुकीची आज मतमोजणी; प्रशासकीय यंत्रणा सज्ज
3. मतदानानंतर बोटावरची शाई पुसणं गैरकृत्य; पुन्हा मतदान करता येणं शक्य नाही-निवडणूक आयोगाचा निर्वाळा
4. 24व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला प्रारंभ आणि
5. 28व्या राष्ट्रकुल परिषदेचं नवी दिल्लीत उद्घाटन

**मतदान**

राज्यातल्या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी काल काही किरकोळ अपवाद वगळता शांततेत मतदान पार पडलं. राज्यभरातल्या एकंदर मतदानाची अधिकृत आकडेवारी अद्याप जाहीर करण्यात आली नाही; पण साधारण 55 ते साठ टक्के मतदान झाल्याचा अंदाज आहे. पुणे महापालिका निवडणुकीसाठी 52 पूर्णांक 42 टक्के मतदान झालं. अन्य महापालिकांपैकी जळगाव शहरातील 63 जागांसाठी सरासरी 53 पूर्णांक 59 टक्के मतदान झालं. नाशिक महापालिकेच्या निवडणूकीसाठी काही मतदान केंद्रांवर रात्री साडे आठ वाजेपर्यंत मतदान सुरू होतं. तिथं सरासरी 56 पूर्णांक 67 टक्के मतदान झाल्याचा अंदाज आहे. सांगलीमध्ये 61 टक्के तर कोल्हापूर महानगरपालिकेसाठी 66 पूर्णांक 54 टक्के मतदान झाल्याचं आमच्या वार्ताहरांनी कळवलं आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी 57 पूर्णांक 71 टक्के मतदान झाले.

बृहन्मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवडसह एकंदर 29 महानगरपालिकांच्या 893 प्रभागांतील 2 हजार 869 जागांसाठी 15 हजार 931 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते, या सर्वांचं भवितव्य काल इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात बंद झालं.

**शाई घटना-निवडणूक आयोग**

मतदान केल्याची नोंद करण्यासाठी मार्करचा वापर केला जात असून ही शाई पुसली जात असल्याच्या तक्रारी अनेक ठिकाणाहून आल्या होत्या. यावर निवडणूक आयोगानं काल स्पष्टीकरण दिलं. बोटावर लावलेली शाई पुसण्याचा प्रयत्न करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करणं हे गैरकृत्य आहे. बोटावरची शाई पुसून एखादी व्यक्ती पुन्हा मतदान करण्यासाठी आल्याचं आढळल्यास त्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असं राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी काल स्पष्ट केलं. बोटावरची शाई पुसून कोणी गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केला तरी संबंधित मतदाराला पुन्हा मतदान करता येत नाही, याबाबतची दक्षता यापूर्वीच घेण्यात आली आहे. 2011पासून स्थानिक स्वराज्यब संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराच्या बोटाला शाई लावण्यासाठी मार्कर पेनचा वापर केला जात आहे, असं आयोगानं म्हटलं आहे.

**तणावाच्या घटना**

राज्यात काही ठिकाणी मतदानाच्या वेळी ताणाव निर्माण झाला होता; मात्र पोलीस आणि निवडणूक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

**मतमोजणी**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीची मतमोजणी आज होणार आहे. त्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज करण्यात आल्या आहेत. मुंबईत आज सकाळी 10 वाजल्यापासून 23 कक्षात मतमोजणी सुरू होईल. यासाठी सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन तसंच कायदा आणि सुव्यवस्था याबाबत आवश्यक ती दक्षता घेण्यात आली आहे.

पुण्यातही महापालिका प्रशासनाने मतमोजणीसाठी जय्यत तयारी केली असून 30 हजार कर्मचारी ही प्रक्रिया पार पाडणार आहेत. शहरात 15 ठिकाणी मतमोजणी होणार आहे. पिंपरी चिंचवडमध्ये 8 ठिकाणी मतमोजणी होणार आहे. ईव्हीएमच्या सुरक्षित वाहतुकीसाठी पोलीस प्रशासन, वाहतूक विभाग तसंच संबंधित यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. जवळपास 11 हजार कर्मचारी मतमोजणी प्रक्रियेत सहभागी होणार आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, टपाली मतपत्रिकेच्या पेट्या आणि मतदान यंत्र आज अभिरक्षा कक्षातून बाहेर काढण्यात येतील. त्या अनुषंगाने, उमेदवार किंवा उमेदवाराने अधिकृतरीत्या नेमलेल्या प्रतिनिधीनी नमूद केलेल्या वेळेत उपस्थित राहावं असं सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कळवलं आहे.

**जिल्हा परिषद निवडणूक**

राज्यातल्या 12 जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी आजपासून अर्ज भरायला सुरुवात होणार आहे. या टप्प्यात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या 12 जिल्हा परिषदांच्या आणि त्या जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांसाठी निवडणुका होणार आहेत.

**शाश्वत शेती**

शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी तसंच शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातले खुनेश्वरचे शेतकरी विजयसिंह चव्हाण यांनीही आपल्या शेतीमध्ये नैसर्गिक शेतीवर भर दिला आहे. याबद्दल त्यांना राज्य शासनाच्या वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कारही मिळाला आहे, नैसर्गिक शेतीबद्दल बोलताना विजयसिंह चव्हाण म्हणाले....

**नैसर्गिक पद्धतीने म्हणजे माझ्या शेतामध्ये बायोगॅस प्रकल्प आहे. जीवामृत स्लरीचा फिल्टर आहे. गांडूळ खताचा मोठा प्रकल्प आहे गांडूळ खतातून जे वर्मी वॉश निघतं, शेळ्यांच्या लेंड्या याचा खताचा वापर मी नियमितपणे करतो. त्याचबरोबर मी पी एच बी असेल के एमबी असेल ट्रायकोडर्मा असेल याही सारख्या जैविक खतांचा नियमितपणे वापर करतो. कीडरोग नियंत्रणासाठी मी नीम करंज असेल, नीम तेल असेल याचा वापर करतो त्याच्यामुळे माझ्या शेतातील कीटकनाशकाचा वापर हा मोठ्या प्रमाणात कमी झाला. सेंद्रिय व जैविक शेती करत असल्यामुळे माझ्या शेतीचं उत्पादन चांगले वाढले असून, जमिनीचा पोतही सुधारला आहे आणि मला असं वाटतं की पुढील पिढीसाठी जर शेती जिवंत ठेवायची असेल, तर जैविक सेंद्रिय पद्धतीने शेती करणे गरजेचे आहे.**

**पिफ**

चित्रपट हे केवळ मनोरंजनाचं साधन नाही, तर ते सामाजिक प्रबोधन आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचं एक प्रभावी माध्यम आहे, असं प्रतिपादन सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव डॉक्टर किरण कुलकर्णी यांनी काल पुण्यात केलं. 24 व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, ज्येष्ठ दिग्दर्शक आणि महोत्सवाचे संचालक डॉक्टर जब्बार पटेल, ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे, ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर आदी यावेळी उपस्थित होते. राज्य सरकार आणि सांस्कृतिक कार्य विभाग दर्जेदार चित्रपट निर्मितीसाठी आणि अशा आंतरराष्ट्रीय महोत्सवांसाठी नेहमीच सहकार्य करत राहील, असं आश्वासन कुलकर्णी यांनी यावेळी दिलं. उद्घाटन सोहळ्यानंतर इटलीचा 'ला ग्राझिया' हा चित्रपट दाखवण्यात आला. हा महोत्सव 22 जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

**राष्ट्रकुल-मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल नवी दिल्लीतील संविधान सदनात 28व्या राष्ट्रकुल परिषदेचं उद्घाटन झालं. या परिषदेत 42 देशांचे सभापती आणि पीठासीन अधिकारी सहभागी झाले आहेत. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला परिषदेच्या अध्यक्षस्थानी आहेत. यावेळी भारतातील लोकशाही, आर्थिक प्रगती अशा विषयांवर पंतप्रधानांनी आपले विचार मांडले. भारतानं आपल्या विविधतेतून आपली लोकशाही बळकट केली. समाजातल्या सर्वांत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणं हाच भारतीय लोकशाहीचा अर्थ आहे आणि कोणताही भेदभाव न करता सामाजिक हित साधण्यासाठी सरकार काम करत आहे, असं पंतप्रधान म्हणाले. या परिषदेत महत्त्वाच्या जागतिक मुद्द्यांवर सखोल चर्चा होईल आणि ठोस धोरणात्मक निर्णय घेतले जातील अशी अपेक्षा लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी व्यक्त केली.

राष्ट्रकुल संघटनेतल्या 42 सदस्य देशांचे 61 अध्यक्ष आणि पीठासीन अधिकारी या परिषदेत भाग घेत आहेत. राज्य विधान परिषदेचे सभापती राम शिंदे देखील या परिषदेला उपस्थित होते. या परिषदेच्या माध्यमातून  भारतीय लोकशाहीचा वारसा जागतिक स्तरावर अधिक उजळून निघेल, असा विश्वास शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

**भारत-ईयू-परिषद**

यंदाच्या प्रजासत्ताकदिनी नवी दिल्लीत कर्तव्यपथावर इथं होणाऱ्या 77 व्या प्रजासत्ताक दिनाच्या समारंभात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो लुईस सांतोस दा कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केलं आहे. 27 तारखेला 16व्या भारत-ईयू शिखर परिषदेचं सहअध्यक्षपद देखील ते भूषवणार आहेत.

**लष्करदिन**

देशभरात काल 78वा लष्कर दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी देशातले सर्व सैनिक, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या. जयपूर इथं लष्कर दिनाचं मुख्य संचलन काल दिमाखात पार पडलं. भारतीय सैन्य दलाच्या जवानांनी विविध कवायतींमधून शिस्त, सामर्थ्य आणि लष्करी क्षमतांचं यावेळी प्रदर्शन केलं. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्या हस्ते हुतात्मा सैनिकांच्या कुटुंबियांना पदक देऊन सन्मानित करण्यात आलं.

**जिल्हा परिषद शाळा-गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम आणि आदिवासी भागांमधील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण,समावेशक आणि भविष्यमुखी शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यासाठी शाळा परिवर्तन प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. यामध्ये माहिती तंत्रज्ञानावर आधारित स्मार्ट वर्गखोल्या, ग्रंथालये, प्रयोगशाळा, स्वच्छतागृहे, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, यांचा समावेश आहे. याबाबत बोलताना गडचिरोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी सुहास गाडे म्हणाले....

**शाळा परिवर्तन प्रकल्पामुळे गडचिरोलीसारख्या दुर्गम जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रामध्ये मूलभूत बदल घडून येत आहेत पायाभूत सुविधा शिक्षक क्षमता डिजिटल शिक्षण आणि समुदाय सहभाग यांच्या एकत्रित प्रयत्नांमधून जिल्हा परिषदेतील काही शाळा सक्षम झाल्या असून हा प्रकल्प गुणवत्तापूर्ण व सर्वसमावेशक अशा सार्वजनिक शिक्षणासाठी राज्यामध्ये पथदर्शी ठरेल असा विश्वास वाटतो**

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात थंडीचा जोर कमी झाला असून आज सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.